असा. क्र. १७५

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, ऑगस्ट १९, २००५/श्रावण २८, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑगस्ट २००५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक व्हीपीएम. २००४/प्र.क्र. २६१/पंरा-५.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) यांच्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एकोणचाळीस) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासन पुढील नियम करीत आहे, आणि ते उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

**नियम**

१. या नियमांना, महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००५ असे म्हणावे.



[किंमत : रुपये ३.००]

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे.) याच्या नियम २ मध्ये, खंड (सहा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (सहा-अ) " पंचायत कर्मचारी " याचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम ६१ अन्वये नियुक्त केलेला पंचायतीचा कर्मचारी, असा आहे. "

३. मुख्य नियमांमध्ये, नियम १० नंतर पुढील नियम जादा दाखल करण्यात येतील :—

**" १०-अ " जिल्हा सेवा (वर्ग तीन) व जिल्हा सेवा (वर्ग चार) मधील विवक्षित पंचायत कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी पात्रता.**—(१) ज्याने ग्रामपंचायत कार्यालयात दहा वर्षांहून कमी नसेल इतकी सलग पूर्ण वेळ सेवा केली असेल असा पंचायत कर्मचारी, जिल्हा सेवेतील वर्ग तीन व वर्ग चार च्या कोणत्याही पदावरील नियुक्तीसाठी पात्र असेल. अशी नियुक्ती थेट ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठतेच्या आधारे संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

(२) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही जिल्हा सेवेतील वर्ग तीन व वर्ग चार ची कोणतीही पदे, नामनिर्देशनाद्वारे भरावयाची असतील त्यावेळी, जिल्हा परिषदेशी संबंधित संवर्गात रिक्त घोषित केलेल्या एकूण पदांच्या दहा टक्क्यांहून कमी नसतील इतकी पदे, ग्रामपंचायत कर्माचाऱ्यांमधून भरण्यात येतील.

(३) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही जिल्हा सेवेतील वर्ग तीन व वर्ग चार ची कोणतीही पदे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधून भरावयाची असतील त्यावेळी, प्रस्तुत सेवाप्रवेश नियमान्वये जिल्हा सेवेतील त्या पदांवरील नियुक्तीसाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा अशा ग्रामपंचायत कर्माचाऱ्यांच्या बाबतीत, पंचेचाळीस वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल :

परंतु, परिशिष्ट एक ते तेरा यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जिल्हा सेवेतील पदे आणि त्याखालील पदे यावरील नियुक्तीकरिता आणि नियुक्तीची पद्धती याकरिता उमेदवाराने धारण करणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादींच्या अधीनतेने, ग्रामपंचायत कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

(४) नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

(५) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यास जिल्हा सेवेतील पदावर रूजू होण्यापूर्वी ताबडतोब ग्रामपंचायतीच्या पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

(६) जिल्हा सेवेतील पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून ग्रामपंचायत कर्मांचाऱ्याला जिल्हा सेवाविषयक अटी, शर्ती व नियम लागू होतील.

**१०ब. वरिष्ठता सूची तयार करण्याची कार्यपद्धती.**—(१) ग्रामसेवक किंवा, यथास्थिती, ग्रामविकास अधिकारी, ज्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची, ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून सलग दहा वर्षे इतकी पूर्ण वेळ सेवा झाली असेल आणि ज्यांच्या वयाची पंचेचाळीस वर्षे पूर्ण झाली नसतील अशा ग्रामपंचायत

कर्मचाऱ्यांची एक सूची तयार करील. अशी सूची, शासन निर्णय, क्रमांक व्हीपीएम. २६९९/सी. आर. २०६ (१)/२१, दिनांक २१ जानेवारी २००० द्वारे विहित केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार तयार करण्यात येईल. परंतु, अपवादात्मक परिस्थितीत, कर्मचारी आकृतीबंधाच्या शर्ती शिथिल करण्याचे आणि ती सूची मंजूर करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात येतील. असे करताना, शासन, गावाची लोकसंख्या, गेल्या तीन वर्षाचे पंचायतीचे उत्पन्न, कर्मचाऱ्यांवरील कामाचा विद्यमान भार गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत त्यांना देण्यात आलेले प्रत्यक्ष वेतन या बाबी विचारात घेईल. तसेच, ग्रामसेवक किंवा ग्रामविकास अधिकारी, प्रत्येक ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सेवा अभिलेख, नियमासोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये तीन प्रतीत तयार करील. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची जेष्ठता निश्चित करताना सदर प्रपत्र परस्पर विचारात घेण्यात येईल. ग्रामसेवक किंवा यथास्थिति, ग्रामविकास अधिकारी, यथोचितरित्या भरलेल्या सदरच्या प्रपत्राची एक प्रत संबंधित गट विकास अधिकाऱ्यांकडे आणि दुसरी प्रत संबंधित ग्रामपंचायत कर्माचाऱ्यास पाठवील.

(२) सदरील प्रपत्राची प्रत मिळाल्यावर, गट विकास अधिकारी, त्याच्या अधिकारितेतील प्रत्येक ग्रामपंचायतीत काम करणाऱ्या सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची दोन प्रतीत, एक संयुक्त वरिष्ठता सूची तयार करील. तसेच, गट विकास अधिकारी, जिल्हा सेवेतील वर्ग तीन आणि वर्ग चारच्या कोणत्याही पदासाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची एक स्वतंत्र वरिष्ठता सूचीदेखील तयार करील. तो, त्या वरिष्ठता सूचीची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवील.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्याकडून मिळालेल्या सर्व वरिष्ठता सूच्यांच्या आधारे एक संयुक्त वरिष्ठता सूची तयार करील आणि तो, उक्त संयुक्त सूचीच्या प्रती, शासन, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांना पाठवील.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सेवेतील पदावर वरिष्ठतम ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील.

(५) ग्रामपंचायत कर्मचारी, जिल्हा सेवेतील वर्ग तीन आणि वर्ग चारच्या पदावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दिलेली नियुक्ती स्वीकारण्यास इच्छुक नसेल तर, तो, त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास ताबडतोब लेखी कळवील :

परंतु, नियुक्ती स्वीकारण्याबाबतच्या अशा नकारामुळे, भविष्यात इतर कोणत्याही पदासाठी त्याला अपात्र ठरविण्यात येणार नाही. ".

**“ प्रपत्र ”**

ग्रामपंचायतीचे नाव :

तालुका : जिल्हा :

(१) ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे नाव :

(२) जन्म दिनांक व सध्याचे वय :
(पूर्ण वर्षात)

(३) धारण केलेले पद :

(४) नियुक्तीचा दिनांक :

(५) शैक्षणिक अर्हता :

(६) इतर अर्हता, असल्यास :

ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचे नाव व सही ग्रामसेवकाचे नाव व सही

ग्रामपंचायतीची मुद्रा असलेला शिक्का

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कुंदा गोसावी,**

शासनाच्या उप सचिव.